# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ नागपूर

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

माहितीचा अधिकार

**अपील क्रमांक : ९८१/२०१९**

**अपीलकर्ता**, श्रीमती मालती मधूकर चामटकर,
मोहीनी नगर, वार्ड नं. २, सुदामपूरी,
वर्धा ता. जि. वर्धा-४४२००१

**जन माहिती अधिकारी तथा क. प्रशासन अधिकारी**
(पंचायत विभाग) जिल्हा परिषद, वर्धा ता. जि. वर्धा

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी**
(पंचायत विभाग) जिल्हा परिषद, वर्धा ता. जि. वर्धा

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.११.२०१९**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित (प्रतिनिधी) |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०३.११.२०१८ | ०१.०२.२०१९ | ११.०२.२०१९ | १६.०३.२०१९ |

अपीलकर्त्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) अन्वये दिनांक ०३.११.२०१८ रोजी जन माहिती अधिकाऱ्याकडे माहितीचा अर्ज सादर केला आहे. सदर अर्जान्वये त्यांनी "(१) पंचायत समिती समुद्रपूर येथील अभिलेखागारात दिनांक ०४.०८.२०१७ ला तपासणी पथकास आढळून आलेल्या दस्ताऐवजाची अनुक्रमे अलग अलग तपशिलवार यादी (२) पंचायत समिती समुद्रपूर येथील अभिलेखागारात दिनांक ०४.०८.२०१७ पूर्वी स्व. चामटकर यांचे सेवाकाळातील मिळून आलेल्या दस्ताऐवजाची अनुक्रमे तपशिलवार माहिती (३) दि. ०४.०८.२०१७ नंतर पंचायत समिती समुद्रपुर येथील अभिलेखागारात स्व. म. मा. यांचे सेवाकार्यकाळातील आढळून अलेल्या दस्ताऐवजांची अनुक्रमे तपशिलवार यादी (४) संपूर्ण यादी व दस्ताऐवज सत्यप्रती " मागितल्याचे दिसून येते.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर महाराष्ट्र राज्य सत्यमेव जयते *नागपूर*

अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दिनांक ३०.०३.२०१९ रोजीच्या अर्जान्वये "माहिती न मिळाल्यामुळे" असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदर द्वितीय अपील अर्जाच्या अनुषंगाने आज दिनांक ०७.११.२०१९ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. आज रोजी सुनावणी दरम्यान अपीलकर्ता यांचेतर्फे श्री. प्रकाश चामटकर उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ प्रशासन अधिकारी, श्री. शारीक परवेज उपस्थित असून प्रथम अपीलीय अधिकारी यांच्यातर्फे प्रतिनिधी म्हणून जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

द्वितीय अपील अर्जाच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता यांचेतर्फे प्रतिनिधी यांनी आयोगासमक्ष कथन केले की, जोडपत्र-अ नुसार अद्यापही कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. त्यावर उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले की, माहितीचे अधिकाराखाली उपलब्ध माहिती देणे अपेक्षीत असून अर्जदाराने तपासणीत सापडलेल्या दस्ताऐवजाची अलग अलग तपशिलवार यादी तयार करुन देण्याची मागणी केल्यामुळे त्यांना अशी माहिती दिली नाही व तपासणीत आढळून आलेल्या दस्तऐवजाची प्रत अपीलार्थी यापूर्वीच देण्यात आली आहेत, असे कळविण्यात आले.

प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्ता यांनी जोडपत्र- अ नुसार मागितलेली माहिती यापुर्वीच पुरविण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांनी तपासणीत सापडलेल्या दस्ताऐवजाची अलग -अलग तपशिलवार यादी तयार करुन देण्याची मागणी केलेली आहे. परंतू माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २(च) प्रमाणे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देणे अपेक्षीत असून माहिती तयार करुन देणे अभिप्रेत नाही. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयात उपलब्ध असलेली व तपासणीत आढळून आलेल्या दस्तऐवजाची प्रती अपीलार्थीस पुरविलेल्या आहेत. परंतू सदर माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी सदर आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात अपीलार्थीस मागितलेल्या माहितीचे अवलोकन देवून त्यांना यापुर्वी देण्यात आलेल्या माहिती व्यतिरिक्त कागदपत्रांची निवड केल्यास त्यांना ५० पृष्ठांपर्यंतची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व उर्वरित माहिती त्यांना सशुल्क पुरवून त्याची पोच आयोगास सादर करावी, असे आदेशीत करुन प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे

अत: आयोगाचे आदेश खालील प्रमाणे आहे.

**<u>आदेश</u>**

प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(दिलीप ल. धारुरकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नागपूर

नागपूर
दिनांक ०७.११.२०१९

13 FEB 2020

जा.क्र.-794-------दि.------------